MHGO080003562024

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | २० | ०३ | २०२४ |
| नोंदणी तारीख | : | २० | ०३ | २०२४ |
| निकाल तारीख | : | १९ | ०५ | २०२६ |
| **कालावधी** | : | **०२ व.** | **०१ म.** | **३० दि.** |

**तिरोडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात,**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती ए.टी.बन्सोड यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. २४/२०२४ निशाणी क्र. (४७)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : ९०७/२०२३.<br>पोलिस स्टेशन : तिरोडा. |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>तिरोडा पोलिस स्टेशन, तिरोडा. |
| अधिवक्ता | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.जी. नागदेवे. |
| आरोपी | १. **आकाश भिमराज आगाशे**<br>वय-२९ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>२. **प्रकाश भिमराज आगाशे**<br>वय-२८ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>दोन्ही रा. सहकार नगर, तिरोडा तह. तिरोडा, जि. गोंदिया |
| अधिवक्ता | आरोपीतर्फे वकील श्री. - डि.जी.चौधरी |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १२/११/२०२३ |
| प्रथम खबरी तारीख | १३/११/२०२३ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | २०/०३/२०२४ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | २०/०३/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १२/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | - |
| न्यायनिर्णयाची तारीख | १९/०५/२०२६. |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

<table>
<tr><th>क्र</th><th>आरोपीचे नाव</th><th>अटकेची</th><th>जामीनावर सुटल्याची तारीख</th><th>आरोपीने केलेले गुन्हे</th><th>निर्दोष किंव्हा दोषी</th><th>शिक्षा ठोठावली</th><th>कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेच्या वेळी अटकेचा कालावधी</th></tr>
<tr><td>१.</td><td>आकाश भिमराज आगाशे</td><td rowspan="2">कलम ४१(१) फौ.प्र.सं. अन्वये</td><td rowspan="2">२०/०३/२०२४</td><td rowspan="2">कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ अन्वये</td><td rowspan="2">निर्दोष</td><td rowspan="2">निरंक</td><td rowspan="2">निरंक</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्रकाश भिमराज आगाशे</td></tr>
</table>

## <u>न्या य नि र्ण य</u>
## ( घोषणा दिनांक १९/०५/२०२६)

आरोपी हे भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**<u>अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.</u>**

**०२.** दि. १२/११/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता आरोपींनी फिर्यादीला फावडयाच्या दांडाने मांडीवर, पाठीवर, मानेवर, कमरेवर मारपीट करून आरोपी क्र. २ लोंखंडी सब्बल घेवून त्याला मारण्यास धावला त्यावेळी त्याने सब्बल अडविली असता त्याला दातखडी लागली. त्याच्या पायाला आणि कमरेला दुखत होते. आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये दि. ३०-०५-२०२२ पासून बांधकामाच्या साहित्यांबाबत व्यवहार सुरू होता. आरोपीने फिर्यादीला दिलेले साहित्य वजनाने कमी भरले त्यामुळे फिर्यादीने त्याला हटकले असता दि. २१/१०/२०२३ रोजी आरोपीने

त्याला बिल दुरूस्त करून दिले परंतु दि. २३/११/२०२३ रोजी आरोपी क्र. १ ने फोन करून त्याचे बिल मिळाले नसल्याने फिर्यादीला दुकानात बोलविले. फिर्यादी दुकानात गेल्यानंतर वरील घटना घडली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन, तिरोडा येथे तक्रार नोंदविली.

**०३.** सदरच्या फिर्यादवरुन आरोपीविरूध्द गुन्हा क्रमांक-९०७/२०२३ भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हवा. श्रीराम सहेसराम टेंभरे यांच्याकडे देण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी तपास पूर्ण करून आरोपींविरुध्द सदर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरूध्द नि.क्र.९ अन्वये भा.दं.वि. कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र नोंदवले. आरोपींना त्यातील मजकूर वाचून व समजावून दाखविण्यात आल्याचे समजते. त्याने नि.क्र. १० व ११ अन्वये दोषारोप अमान्य करुन खटला चालविण्याची मागणी केली. आरोपींविरूध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयान नि.क्र. ४४ व ४५ अन्वये नोंदविण्यात आले.

**०५.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दि. १२/११/२०२३ रोजी सकाळी ११:०० च्या सुमारास मौजा सहकारनगर, तिरोडा तह. तिरोडा, गोंदिया येथे आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादीला | |

| | | |
|---|---|---|
| | फावडयाच्या दांडाने आणि सब्बलने मारुन आपखुशीने फिर्यादीला दुखापत पोहचवली व त्याप्रमाणे भा.दं.वि. ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ....नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी शिवीगाळ केली व त्याप्रमाणे भा.दं.वि. ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ....नकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

**: : कारण मिमांसा : :**

**फिर्यादी/आरोपी/ न्यायालयाती साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष :-**

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १. | राधेश्याम मनिराम पाटील | १३ | पंच |
| २. | निखील राधेश्याम कुसुंबे | २० | साक्षीदार |
| ३. | रविंद्रकुमार किसन धावडे | २२ | फिर्यादीचे |
| ४. | कामेश सुर्यप्रकाश पटले | २८ | साक्षीदार |
| ५. | डॉ. चंद्रशेखर हेमराज पारधी | २९ | वैद्यकीय अधिकारी |
| ६. | श्रीराम सहेसराम टेंभरे | ३९ | तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
| | निरंक | | निरंक |

## क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | निरंक |

## फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी

## अ. फिर्यादीपक्ष :-

| **क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | २३ | फिर्याद |
| २. | २४ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | ३० | जखमीचे प्रमाणपत्र |
| ४. | ३१ | परीक्षणासाठी दिलेले पत्र |
| ५. | ३२ | क्युरी अहवाल |
| ६. | ४० | पंचनामा |
| ७. | ४१ | मुद्देमाल पावती |
| ८. | ४२ व ४३ | सा.क्र. २ व ४ यांचे बयान |

**<u>मुद्दा क्रमांक ०१ व २ करिता</u>:-**

**०६.** अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.३ रविंद्रकुमार धावडे (फिर्यादी) यांनी आपल्या तोंडी पुराव्यात कथन केले आहे की, आरोपीकडून तो मागील दिड वर्षापासून लोहा, तार, खिळे इत्यादी साहित्य विकत घेत होता आणि त्याच्याकडे खरेदी केलेल्या लोखंडी पाईपचे वजन कमी असल्याची शंका आल्याने त्याने दुसरीकडून पाईपचे वजन केले. त्यानंतर त्याने आरोपी क्र. १ कडे गेला असता त्याने बिल दुरूस्त करून देता असे म्हणून आठ दिवसानंतर बिल दुरूस्त झाले असून त्याला दुकानात बोलविले. त्यावेळी आरोपी क्र. १ ने फिर्यादीला रूपये २०००/- देवून ठेकेदाराला सांगू नको असे म्हटले.

**०७.** त्याने पुढील पुराव्यात असे कथन केले की, घटनेच्या एक दिवसापूर्वी आरोपी क्र. १ ने सायंकाळी ०५:०० वाजता फोन करून त्याचे बिल मिळाले नसल्याने त्याला दुकानात बोलाविले आणि फोनवर शिवीगाळ केली. घटनेच्या दिवशी फिर्यादीने आरोपीच्या दुकानात जावून शिवीगाळ का करता असे म्हटले असता आरोपी क्र. १ ने त्याला शिवीगाळ करून फावडयाच्या दांडाने त्याच्या कमरेवर, मानेवर, मांडयावर मारहाण केली. तसेच आरोपी क्र. २ ने त्याला लोखंडी सब्बलने मारल्यामुळे त्याच्या दात खळीवर मार लागला. त्याने नि.क्र. २३ व २४ अन्वये आरोपींविरूध्द फिर्याद व प्रथम माहिती अहवाल नोंदविला आणि वस्तु क्र. १ व २ वर फावडयाचा दांडा आणि लोखंडी सब्ब्ल ओळखली.

**०८.** आरोपीतर्फे सा.क्र ३ यांची उलटतपासणी घेतली असता त्याला घटनेची नेमकी तारीख सांगता आलेली नाही. तसेच त्याचे बयानातील आणि न्यायालयासमक्ष झालेल्या बयानात तफावत असल्याचे अभिलेखावर आणलेले आहे. सदर साक्षीदाराने तो कामानिमित्त पुजारीटोला येथून तिरोडा येत असतो आणि त्याचा येण्याचा मागी उखडलेला असल्याचे त्याने मान्य केलेले आहे. परंतु मोटरसायकलने येत असतांना तो पडला, त्याला मार लागला आणि आरोपीसोबत त्याचे पूर्वीपासून पटत नसल्याने

झालेल्या इजांचा गैरफायदा घेवून खोटी फिर्याद नोंदविल्याचे नाकारलेले आहे.

**०९.** सा.क्र. २ निखिल कुसुबे व ४ कामेश पटले सदर प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षाचे समर्थन केलेले नाही. तसेच सा.क्र. १ राधेश्याम पाटील सदर प्रकरणातील जप्त व घटनास्थळ पंचानाम्यावरील पंच असुन त्याने देखील अभियोगपक्षाचे समर्थन केलेले नाही.

**१०.** सा.क्र. ५ डॉ. चंद्रकिशोर पारधी यांनी आपल्या तोंडी पुराव्यात कथन केले की, दि. १२/११/२०२३ रोजी वैद्यकीय अधिकारी सरकारी रूग्णालय तिरोडा येथे कार्यरत असतांना फिर्यादी यांची त्यांनी वैद्यकीय तपासणी केली असता डाव्या बाजूला जखम असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी नि.क्र. ३० अन्वये जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. नि.क्र. ३१ अन्वये परीक्षण अहवाल करून मिंळण्याबाबत पत्र प्राप्त झाल्यान तर नि.क्र. ३२ अन्वये परीक्षण अहवाल देवून जप्त मुद्देमालाने फिर्यादीला जखम झाली असावी असे मत त्यांनी नोंदविले.

**११.** आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये नि.क्र. ३० वरील प्रमाणपत्रावर आकस्मीक क्रमांक नमूद नसून त्यांनी फिर्यादीचे ओळखपत्र तपासले नसल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्यांनी असेही मान्य केले की, एखादी व्यक्ती मोटरसायकलने खळबळ जागेवर पडल्यास अशाप्रकाराच्या इजा होवू शकतात. त्यांनी अहवालामध्ये फक्त शक्यता नमूद केलेली आहे असे देखील मान्य केले.

**१२.** सा.क्र. ६ तपासी अधिकारी श्रीराम टेंभरे यांनी आपल्या तोंडी पुराव्यात कथन केले की, त्यांना केस डायरी प्राप्त झाल्यानंतर नि.क्र. ४० अन्वये जप्ती व घटनास्थ्ळ पंचनामा पंचासमक्ष तयार केला. नि.क्र. ४१ अन्वये जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला. नि.क्र. ३१ अन्वये वैद्यकीय अधिकारी यांना परीक्षण अहवाल मिळण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर साक्षीदारांचे बयान नोंदवून आरोपींविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सा.क्र. २ व ४ यांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे नि.क्र. ४२ व ४३ अन्वये नोंदविले.

**१३.** आरोपीपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये पंचनाम्यामध्ये मुद्देमालाचे विस्तृत वर्णन नमूद केलेले नसल्याचे मान्य केले. तसेच दोषारोपपामध्ये आणि प्रथम माहिती अहवालामध्ये फिर्याद नोंदविण्यास विलंब झाल्याचे कारण नमूद करण्यात आलेले नाही. उलटतपासणीमध्ये त्यांनी मान्य केले की, तपासादरम्यान फिर्यादी व आरोपीमध्ये जुने वाद असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. घटनास्थळ नेहरू वार्ड असल्याचे कथन केले. दोषारोपपत्राची पाहणी केली असता घटनास्थळ सहकार नगर असल्याचे दिसून येते.

**१४.** अभिगयोगपक्षाला पंच साक्षीदार व इतर प्रत्यक्ष साक्षीदार समर्थन केलेले नसल्याने आणि घटनास्थळ नेमके कोठे आहे याबाबत सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. अभियोगपक्षाला किंवा फिर्यादीच्या कथनाला समर्थन करणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट प्रत्यक्षदर्शी साक्षीदार घटनेबाबत काहीच माहित नसल्याचे कथन करतात. तपासादरम्यान फिर्यादी व आरोपीपक्षांमध्ये जुने वाद असल्याचे निष्पन्न झाल्याचे तपासी अधिकारी कथन करतात त्यामुळे फिर्यादीच्या कथनाला समर्थन करणारा किंवा दुजोरा देणारा पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे होते.

**१५.** याव्यतिरिक्त आरोपीच्या बचावानुसार फिर्यादीचे गाव पुजारीटोला येथून तिरोडा येत असतांना खळबळ रस्ता असुन त्यावरून फिर्यादी पडला आणि त्यात झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून त्याने प्रस्तुत तक्रार आरोपीविरूध्द नोंदविली. तसेच घटना दि. १२/११/२०२३ रोजीची सकाळी ११:०० वाजताची असून दि. १३/११/२०२३ दुपारी ०१: ०० वाजता तक्रार नोंदविण्यात आल्याचे दिसून येते. तक्रार नोंदविण्यास झालेल्या विलंबाचे अभियोगपक्षाने कोठेही स्पष्टीकरण दिलेले नाही. वैद्यकीय अधिकां-यांच्या कथनाप्रमाणे फिर्यादीला झालेली जखम खळबळ जागेवर पडल्याने होवू शकते. त्यामुळे खरोखरच फिर्यादीच्या कथनाप्रमाणे घटना घडली असावी यात शंका निर्माण होते, कारण इतर दोन्ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादीला समर्थन

करीत नाही.

**१६.** वरील कारणास्तव सदर प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द असलेले आरोप संशयापलीकडे सिध्द करण्यात अभियोगपक्ष अयशस्वी ठरला असे माझे मत असल्याने आरोपींना संशयाचा फायदा देवून त्याची सदर प्रकरणातून मुक्तता करणे न्यायाच्या दृष्टीने उचित ठरले असे माझे मत आहे. त्यामुळे मुददा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

**: : आ दे श : :**

**१.** आरोपींना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींची जामीन कब्जे रद्द करण्यात येते.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रूपये १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) प्रत्येकी जामीन दयावे.

**०४.** सदर प्रकरणात जप्त असलेला एक फावडयाचा लाकडी दांड व लोखंडी सब्बल मुल्यहीन असल्याने अपीलची मुदत संपल्यानंतर कायदयाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

Digitally signed by APEKSHA TULARAM BANSOD
Date: 2026.05.19 17:03:24 +0530

**(श्रीमती ए.टी. बन्सोड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**तिरोडा.**

**दिनांक :१९.०५.२०२६.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word, as per the assigned judgment.

Name of Stenographer :- S.M.Marathe

Court :- Judicial Magistrate, F.C.
Tirora.

Judgment signed by the
Presiding Officer on :- 19-05-2026

Judgment uploaded on :- 19-05-2026